(सीएनआर नं. एमएचएमएम-१२-०१६२८१-२०१८)

दाखल दिनांक - २७.०३.२०१८
नोंदणी दिनांक - २७.०३.२०१८
निकाल दिनांक - ३१.०७.२०१९
कालावधी - ०१ व, ०४ म, ०४ दि.

महानगर दंडाधिकारी, २५वे न्यायालय, माझगांव, मुंबई

( पी. आय. मोकाशी यांच्या न्यायालयात )

खटला कमांक १४६३१/पीएस/२०१८
निशाणी क.२७.

भायखळा पोलीस ठाणे,
मुंबई ...... अभियोगपक्ष

विरूध्द

हणुमंत बापू गायकवाड
वय:- ५५ वर्षे,
राहण्याचा पत्ता:- साईप्रसाद को-ऑप हौ. सोसायटी,
इ/१, रुम नं.४, खांदा कॉलनी, सेक्टर -८,
नवीन पनवेल, रायगड. ..... आरोपी

आरोपीविरुद्धचा दोषारोप :- भारतीय दंड विधान, १८६० च्या २७९, ३३७,३३८ आणि मोटार वाहन कायदा १३४ (अ) (ब) सह १८४ या कलमांतर्गत शिक्षापात्र

अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता :- श्री. शशिकांत ईघारे

आरोपीतर्फे अभियोक्ता :- श्री. एम एम पाटणेकर

न्यायनिर्णय

( दिनांक ३१ जुलै २०१९ रोजी देण्यात आला)

दिनांक १७/०४/२०१७ रोजी सकाळी ०८.४० वाजणेचे सुमारास फिर्यादी नामे देवेद्र दत्ताराम कदम हे त्यांच्या स्वत:च्या मालकीची यूनिकॉर्न कंपनीची मोटरसायकल क.एमएच-०१-ए झेड-१२०४ वरुन लालबाग मुंबई येथे जाण्यासाठी निघाले असता सुमारे ०८.४० वाजता ते अप्पर पोलीस आयुक्त मध्यप्रादेशिक विभाग कार्यालयासमोरील सिग्नल लागल्याने नमुद सिग्नलवर थांबले होते. त्यावेळी सदर ठिकाणी रस्तादुरुस्तीचे काम चालू असलेने रस्त्यावर बॅरीकेट्स लावले होते. सुमारे ०८.४० वाजता राणीबाग येथे जाण्यासाठी लागलेला सिग्नल सुटल्याने फिर्यादी यांच्या डाव्या बाजूने पुढे जाण-या बी ई एस टी बस कमांक एम एच ०१ एल ए ५८१० च्या चालकाने डावीकडे वळण घेत असताना नमुद बसच्या उजव्या बाजूचा धक्का फिर्यादी यांचे मोटारसायकलला लागलेमुळे फिर्यादी मोटारसायकलसह जमीनीवर पडले. त्यावेळी बस चालक याने फिर्यादीस कोणत्याही प्रकारची मदत न करता बस घेवून सदर ठिकाणहून निघून गेला. सदर अपघातामुळे फिर्यादी यांचे डाव्या पायाचे नडगीचे घोटयाजवळचे हाड फ्रॅक्चर झाले असलेचे उपचारादरम्यान डॉक्टरांनी सांगितले, या कारणावरून आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा १३४(अ)(ब) सह १८४ अन्वये अपराध केल्याचा आरोप आहे. तपासामध्ये आरोपींनी वरील गुन्हा केल्याचे आढळून आले.

२) पोलीस उपनिरीक्षक श्रीमती. रोहीणी प्रकाश सोनावले यांनी सदर गुन्हयाचा तपास केला आणि तपास पूर्ण झाल्यानंतर या न्यायालयात दिनांक २७/०३/२०१८ रोजी आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

३)        या न्यायालयाने पाठविलेल्या दखलफर्मानावरुन आरोपी हजर झाला. त्याला सर्व पोलीसकागदपत्रांच्या नकला देण्यात आल्या. वरील गुन्हयाकरिता आरोपीविरुद्ध या न्यायालयाने (निशाणी कमांक-६ प्रमाणे) दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा अमान्य केल्यावरुन त्याच्याविरुद्ध पुढे खटला चालविण्यात आला. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आला असलेने आरोपीचे फौजदारी प्रकिया कलम ३१३ नुसार जबाब नोंदविण्यात आला. सदर जबाबामध्ये आरोपीने फिर्यादीला झालेला अपघात हा आरोपीच्या ताब्यातील बसने दिलेल्या धडकेने झालेचे स्पष्टपणे नाकारले.

४)        एकंदर अभियोगपक्षाची हकिकत व पुराव्यावरून पुढील मुद्‌दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे,

| अ.क. | मुददे | कारणमिमांसा |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, दिनांक १७.०४.२०१७ रोजी ०८.४० वाजताच्या दरम्यान, अप्पर पोलीस आयूक्त मध्याप्रादेशिक विभाग कार्यालयासमोरील सिग्नल मुंबई येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील बी ई एस टी बस कमांक एम एच ०१ एल ए ५८१० ही हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालविली ? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वरील कमांकाची बी ई एस टी बस हयगयीने अगर निष्काळजीपणाने चालविली व फिर्यादीच्या ताब्यातील यूनिकॉर्न कंपनीची मोटरसायकल क. एम एच - ०१ - ए झेड - १२०४ हिस धडक दिली व फिर्यादी यांना दुखापती केल्या ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्ष हे सिद्ध करु शकला काय, की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने अपघाताची खबर दिली नाही व जखमीला जवळच्या दवाखान्यात उपचाराकरीता न नेता तेथून पळून गेला ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

मुददा कमांक १ ते ३ ला अनुसरून :-

५) आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे फिर्यादी देवेंद्र दत्ताराम कदम यांची निशाणी १७ प्रमाणे साक्षीदार कमांक १ म्हणून साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे सांगितले की दिनांक १७.०४.२०१७ रोजी ते त्यांच्या मोटरसायकल वरुन लालबाग येथे जात होते. तेव्हा फिर्यादी यांच्या डाव्या बाजूने पुढे जाणा-या बी ई एस टी बस कमांक एम एच ०१ एल ए ५८१० च्या चालकाने डावीकडे वळण घेत असताना नमुद बसच्या उजव्या बाजूचा धक्का फिर्यादी यांचे मोटारसायकलला लागलेमुळे फिर्यादी मोटारसायकलसह जमीनीवर पडले. त्यावेळी बस चालक याने फिर्यादीस कोणत्याही प्रकारची मदत न करता बस घेवून सदर ठिकाणहून निघून गेला. सदर अपघातामुळे फिर्यादी यांचे डाव्या पायाचे नडगीचे घोटयाजवळचे हाड फ्रॅक्चर झाले असलेचे उपचारादरम्यान डॉक्टरांनी सांगितले.

आरोपी यांचे विधिज्ञ श्री. एम एम पाटणेकर यांनी फिर्यादी यांचा उलटतपास घेतला असता फिर्यादी यांनी असे सांगितले की, ते गेल्या दहा वर्षापासून मोटारसायकल चालवित आहेत. तसेच सदर रस्त्यावर सकाळच्या वेळी जास्त ट्राफिक असते. तसेच त्या रस्त्यावर दुरुस्तीचे काम सुरु असलेमुळे एका वेळी सदर

रस्त्यावरुन एक मोठे वाहन किंवा दोन छोटी वाहने जावू शकतात असे देखील त्यांनी सांगितले.

फिर्यादी यांनी त्यांचे उलटतपासात असेही सांगितले कि, गुन्हा नोंद करत असताना त्यांनी पोलिसांना हे सांगितले होते की, वर नमुद बसने मला धक्का दिला त्यावेळी ते जोरात ओरडले होते तरीदेखील बस चालकाने बस तशीच पूढे नेली होती. परंतू ही गोष्ट त्यांच्या तक्रारीमध्ये नमुद का नाही याचे ते काहीच कारण देवू शकत नाहीत.

फिर्यादी यांनी त्यांचे उलटतपासात असेही सांगितले की, ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी सदर बसचा वेग हा साधारण होता.

६) आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे मित्तल अमृतलाल कारसीया यांची निशाणी २३ प्रमाणे साक्षीदार क्रमांक २ म्हणून साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की दिनांक १७. ०४.२०१७ रोजी ते भायखळा येथे जात होते. त्यावेळी त्यांनी आवाज ऐकला त्या आवाजाच्या दिशेने त्यांनी पाहीले असता एक मोटारसायकलस्वार यांच्या डाव्या बाजूने पुढे जाण-या बी ई एस टी बस क्रमांक एम एच ०१ एल ए ५८१० च्या चालकाने डावीकडे वळण घेत असताना नमुद बसच्या उजव्या बाजूचा धक्का फिर्यादी यांचे मोटारसायकलला लागलेमुळे फिर्यादी मोटारसायकलसह जमीनीवर पडले. त्यावेळी बस चालक याने फिर्यादीस कोणत्याही प्रकारची मदत न करता बस घेवून सदर ठिकाणाहून निघून गेला. सदर अपघातामुळे फिर्यादी यांचे डाव्या पायाचे नडगीचे घोटयाजवळचे हाड फ्रॅक्चर झाले असलेचे उपचारादरम्यान डॉक्टरांनी सांगितले.

आरोपी यांचे विधिज्ञ श्री. एम एम पाटणेकर यांनी साक्षीदार क्रमांक २ यांचा उलटतपास घेतला असता साक्षीदार क्रमांक २ यांनी असे सांगितले की,

लाल रंगाचा सिग्नल असलेमुळे सदर रस्त्यावरील सर्व वाहने जागेवरच एका मागोमाग एक अशी उभी होती. तसेच त्या रस्त्यावर दुरुस्तीचे काम सुरु असलेमुळे एका वेळी सदर रस्त्यावरुन एक मोठे वाहन किंवा दोन छोटी वाहने जावू शकतात असे देखील त्यांनी सांगितले. सदर घटनेच्या वेळी पाच ते सहा वाहने त्या रस्त्यावर उभी होती असेही त्यांनी सांगितले. त्यांना फिर्यादीच्या मोटारसायकलचा नोंदणी कमांक माहीत नाही असे सांगितले.

साक्षीदार कमांक २ यांनी त्यांच्या उलटतपासात असे सांगितले की आवाज ऐकल्यानंतर त्यांनी त्या आवाजाच्या दिशेने पाहीले असता एक मोटारसायकलस्वार मोटारसायकलसहीत खाली पडलेला दिसला.

साक्षीदार कमांक २ यांनी त्यांचे उलटतपासात असेही सांगितले की, ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी सदर बसचा वेग हा साधारण होता.

७) साक्षीदार कमांक १ देवेंद्र दत्ताराम कदम यांच्या उलटतपासामध्ये असे सिध्द् झाले आहे की, त्यांनी बस धडकल्यानंतर जोरजोरात आरडाओरडा केला असे त्यांच्या फिर्यादीमध्ये नमुद नाही. त्याचे कारण त्यांना सांगता आले नाही. तसेच साक्षीदार कमांक २ मित्तल अमृत कारसीया यांचे साक्षीपुराव्यात असे सिध्द् झाले आहे की, त्यांना फिर्यादी यांचे मोटारसायकलचा कमांक माहित नाही. तसेच ते फिर्यादी यांस नावानिशी ओळखत नाहीत. दोन्ही साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, घटनेच्या ठिकाणी रस्तादुरुस्तीचे काम चालू असेलेने रस्ता अरुंद झाला होता व तेथून दोन लहान वाहने एकाच वेळी जावू शकत नव्हते तसेच एक बस तेथून जावू शकत होती. साक्षीदार कमांक २ मित्तल अमृत कारसीया यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांना आवाज ऐकू आल्यानंतर त्यांनी मोटारसायकलस्वार खाली पडल्याचे पाहीले. त्यामुळे साक्षीदार कमांक २ मित्तल अमृत कारसीया हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होत नाहीत. तसेच अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनसुध्द्ा अभियोग पक्षाने तपासी अंमलदार हे

हजर राहीले नसलेने त्यांना तपासले नाही. त्यामुळेच तपासी अंमलदार यांचे तपासमध्ये काय निष्पन्न झाले हे सिध्द् होत नाही.

८) आरोपीने जखमेचा दाखला निशाणी क.१९, मद्यप्राशन परीक्षण दाखला निशाणी २०, अपघात दाखला निशाणी ११ आणि १२ जरी मान्य केला असला तरीही सदर जखमा आरोपी चालवित असलेल्या बसने धडक मारल्यामुळे झाले आहेत हे सिध्द होत नसल्यामुळे, आरोपी याने त्याच्या ताब्यातील बी ई एस टी बस कमांक एम एच ०१ एल ए ५८१० हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालवून फिर्यादीस धडक दिली व गंभीर दुखापत केली हे सिध्द होत नाही. अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्याची आवश्यकता नसल्याने अभियोगपक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे आरोपीने अपराध केल्याचे सिध्द् होण्यासाठी आवश्यक असणारे घटक सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुददा क. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुददा कमांक ४ ला अनुसरून :-</u>

९) मुद्दा क.१ ते ३ मध्ये अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द, आरोपी याने त्याच्या ताब्यातील बी ई एस टी बस कमांक एम एच ०१ एल ए ५८१० हयगयीने अगर निष्काळजीपणाने, मानवी जीवितास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने चालवून फिर्यादी यांच्या मोटारसायकलला धडक दिली व फिर्यादी यांना गंभीर दुखापत केली व फिर्यादीस मदत न करता घटनास्थळावरुन पळून गेले. हे संशयापलीकडे जावून सिध्द केले नाही. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा १३४(अ)(ब) सह १८४ अन्वये आवश्यक घटक सिध्द केले नाहीत. म्हणून आरोपी हे त्याच्यावर ठेवलेल्या आरोपातून दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रूपये १५,०००/- चा वैयक्तिक जात

मुचुलका व तितक्याच रकमेचा जामीन कदबा याची पूर्तता केली आहे. म्हणून मी मुद्दा क. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

१) आरोपी हनुमंत बापू यादव यांस फौजदारी प्रकिया संहिता कलम २५५(१) नुसार भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा १३४ (अ) (ब) सह १८४ अन्वये अपराध केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचे पूर्वीचे जामीनकदबे आणि बंधपत्र रद्दबातल करण्यात येत आहेत.

दिनांक :- ३१/०७/२०१९

Parvez Isahaquekhan Mokashi

Digitally signed by Parvez Isahaquekhan Mokashi
Date: 2019.08.01 11:28:00 +0530